महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४९ वा | दिनांक : २९/०७/२०२५ | वार : मंगळवार

## भारताला एकाही देशाचा पाठिंबा का नाही?: अरविंद सावंत



**दिल्ली:** लोकसभेत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल उपस्थित केला. ऑपरेशन सिंदूर वरून केंद्र सरकारवर अरविंद सावंत यांनी हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले. याच सोबत भारतीय सैन्याचे कौतुक देखील केले.

अरविंद सावंत म्हणाले, जेव्हा ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलले जात, तेव्हा पहिल्यांदा तर हे का झाले असा प्रश्न आहे. पहलगाम हल्ला झाला आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर केले. मी काही काळासाठी मंत्री होतो आणि जेव्हा काश्मीरमध्ये गेलो होतो इलेक्ट्रिक बसेसचे उद्घाटन करायला. तेव्हा ठिकठिकाणी पोलिस तैनात होते, तसेच सशस्त्र जवान उपस्थित होते. मग पहलगामचा हल्ला झाला तेव्हा तिथे कोणीच कसे नाही? पोलिस नाही, जवान नाही? पर्यटक आले होते त्यांच्या सुरक्षेसाठी कोणीच कसे नाही? सैन्याला आदेश कोणी दिले होते तिथून जाण्यासाठी? इथून तपास झाला पाहिजे.

मंत्री असताना मी सुद्धा पहलगामला गेलो होतो. एवढे मोठे मैदान आहे तिथे. मी गेलो तेव्हा तिथे पोलिस होते जवान होते. मग त्या दिवशी सगळे जवान कुठे गेले होते? हे आतंकवादी कुठून आले होते? या पूर्वी देखील अनेक आतंकवादी हल्ले झाले आहेत. मुंबईच्या साखळी ब्लास्टमधल्या अनेकांना निर्दोष मुक्त केले. याचा अर्थ असा की आपण आतंकवादी म्हणून निर्दोष लोकांना पकडले होते. आपण आतंकवाद्यांना पकडू शकलो नाही.

काश्मीरचे सत्यपाल मलिक जेव्हा राज्यपाल होते, तेव्हा त्यांनी सरकारला वेळोवेळी सांगितले की काहीतरी गडबड आहे. या सीआरपीएफ जवानांना विमान देण्यात यावे. पण या सरकारने दिले नाही. त्यांनी पंतप्रधानांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. पण, आपले प्रधानमंत्री कॉर्बीट पार्कमध्ये होते. एवढा मोठा हल्ला झाला, ते तिथे नाही गेले. ते आधी दिल्लीला गेले, तिथून दुसऱ्या एका कार्यक्रमाला गेले. पुलवामाच्या हल्ल्यापूर्वी सत्यपाल मलिक सारखं सारखं म्हणत होते गडबड होणार आहे आणि तुम्ही जवानांना विमान न देता रस्त्याच्या मार्गाने पाठवले. 40 जवान शहीद झाले. आजपर्यंत पकडले गेले नाहीत आतंकवादी.

ऑपरेशन सिंदूर नाव देऊन भावनांशी खेळत आहात. सिंदूर कोणाचे पुसले गेले आपल्या बहीणींचे. त्या आतंकवाद्यांना आजपर्यंत पकडू शकले नाहीत आणि सिंदूर नाव देता. आपण दहशतवाद्यांवर हल्ले केले मी मान्य करतो. पण हे आतंकवादी पकडले गेले नाहीत. तुम्हाला काही वाटत नाही? असे म्हणत अरविंद सावंत यांनी थेट मोदींनाच सवाल केला.

बिहारमध्ये जाऊन इंग्रजीत भाषण करता, पहलगाममध्ये अजून गेले नाहीत. आजपर्यंत मणिपूरला सुद्धा गेले नाहीत. तुम्हाला वेदना नाही होत का? दुःख नाही होत? त्रास नाही होत? लाज नाही वाटत? आणि इथे ढोल वाजवत बसतात. तुम्ही जर मोकळीक दिली होती तर बिनशर्त युद्धबंदी कसे काय केले? बिनशर्त का युद्धबंदी केली?

आपली सगळ्यात मोठी वाईट गोष्ट ही आहे की एक राष्ट्र सुद्धा आपल्यासोबत बोलत नाही. आपण तर विश्वगुरु म्हणवतो स्वतःला. विविध देशांमध्ये जाऊन युद्धावर बोलून आलो. पण एक देश सुद्धा आपल्यासोबत नाही उभे राहिले. ते इस्राइल तरु उभे राहिले का आपल्या बाजूने? त्याच्यासाठी आपण इराकला विरोध केला. तो इराक जो आपल्याला तेल देतो, पैसे नंतर द्या म्हणतो पण तेल घ्या म्हणतो. त्या इराकसोबतचे संबंध सुद्धा बिघडले. हे आहे आपले परराष्ट्र धोरण!

हल्ले झाले तेव्हा पाकिस्तानच्या बाजूने चीन होते, तुर्की होते. आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपल्या बाजूने एकही देश का उभे राहत नाही? आपण काय वाईट केले आहे? नेमके युद्धाच्या वेळी इंटरनॅशनल मोनिट्रिंग फंड पैसे देतो पाकिस्तानला. याचा अर्थ आपल्या देशाची काय स्थिती आहे जगात? जी7 मध्ये सुद्धा नाही बोलावले आपल्याला. युद्धाच्या वेळी आमचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी आम्हाला आदेश दिले होते ही वेळ राजकारण करण्याची नाही. आपण पंतप्रधान मोदींना पाठिंबा दिला पाहिजे. युद्धानंतर आपण टीम पाठवल्या काय झाले? त्या देशांमध्ये पत्रकार परिषद झाली? कोणी समोर येऊन पाठिंबा दिला? कोणी नाही आले. सगळं व्यर्थ ठरले, हे आमचे दुःख आहे. राष्ट्राची गोष्ट असेल आम्ही सोबत आहोत.

पाकिस्तान व्याप्त काश्मीर जिंकण्यासाठी आपल्याकडे संधी होती. ज्या पद्धतीने इंदिरा गांधींनी पाकिस्तानला धडा शिकवला त्याचप्रमाणे धडा शिकवण्याची संधी आपल्याकडे होती. तुम्ही जर तसे केले असते तरी आम्ही मोदींनी डोक्यावर घेऊन नाचलो असतो. पण तुम्ही ती संधी घालवली. 'घुसके मारेंगे' ही भाषा भाजपकडून सातत्याने वापरली जाते. पण ओसामा बिन लादेनला जसे मारले ते खरे 'घुसके मारेंगे'. ज्या पाकिस्तानने भारताविरोधात दहशतवादी हल्ले केले त्या पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणे बंद करा.

## वाल्मीक कराडला माझे हातपाय तोडताना पाहायचे होते : शिवराज बांगर



**बीड :** कृषिमंत्री असताना धनंजय मुंडे यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरवत क्लीन चिट दिली आहे. आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शिवराज बांगर यांनी एक मोठा आणि खळबळजनक दावा करत धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत. तसेच, वाल्मीक कराडला माझे हातपाय तोडताना थेट पाहायचे होते, असेही त्यांनी म्हटले आहे.

बीड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेत शिवराज बांगर यांनी धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्याबद्दल धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. वाल्मीक कराडने माझ्या खुनाची सुपारी दिली होती. त्याला माझे हातपाय तोडताना लाईव्ह पहायचे होते. ज्याला सुपारी दिली त्या सनी आठवले याने माझा खून केला नाही. त्यामुळे त्या सनी आठवलेला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले, असे बांगर यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना शिवराज बांगर म्हणाले, परळी येथील व्यापारी महादेव मुंडे खून प्रकरणानंतर आता सरपंच बापू आंधळे यांचा खून देखील वाल्मीक कराड यांच्या सांगण्यावरूनच झाला असल्याचा दावा बांगर यांनी केला आहे. वाल्मीक कराड हा प्यादा आहे. वाल्मीक कराडच्या पाठीमागे धनंजय मुंडे यांची ताकद होती. त्याच ताकदीने हे सर्व करून घेतलेले आहे. त्यामुळे मेरी कोई गलती नही असे धनंजय मुंडे म्हणू शकत नाहीत, असा आरोप बांगर यांनी केला आहे.

बापू आंधळे यांची हत्या गोट्या गीते आणि गँगने वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून केली. त्या गुन्ह्यामध्ये महादेव गीतेला गोळ्या घातल्या तो जेलमध्ये आहे. विधानसभेला बबन गीते आडवा येईल म्हणून ही हत्या केली. तसेच एसआयटी नेमून बापू आंधळे खून प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी शिवराज बांगर यांनी केली आहे.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ जुलै २०२५


## करोडी ते धुळे या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणत मोठ मोठे खड्डे





**दौलताबाद (जावेद अहेमद) :** करोडी ते धुळे या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणत मोठं मोठे खड्डे पडले आहेत, या खड्यामध्ये पडून दुचाकीस्वार जखमी होत आहेत तर चारचाकी वाहने टायर फुटून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.या खड्यामुळे आतापर्यंत मोठ्या संख्येने वाहनाचे नुकसान झाले आहे.

मुळातच कन्नड ते करोडी हा माहामार्ग अत्यंत निकृष्ट दर्जाचा निर्माण केला गेला आहे, तीन वर्षात दोन पूल कोसळल्याने दिलीप बिल्डकॉन या कंपनीला हे पूल पुन्हा तयार करावे लागले आहे. या मार्गावर मागील तीन वर्षापासून मोठ्या प्रमाणत खोल खड्डे पडले असून रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ता अशी अवस्था झाली आहे, या मुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या महामार्गावर मोठं मोठे खड्डे पडले असून या खड्यात पडून अथवा चुकवताना दररोज एक तरी छोटा मोठा अपघात होत आहे, अनेकदा मागणी करूनही अद्याप या रस्त्याची दुरुस्ती सम्बधित विभाग करत नाही या विषयी वारंवार निवेदने दिली आहे अजून किती निरपराध लोकांचा बळी हा विभाग घेणार अशी संतापजनक प्रतिक्रिया स्थानिक ग्रामपंचायत सदस्य यांनी दिली आहे.

संबंधित ठेकेदार कंपनीला या सर्व बाबींकडे संबंधित दुर्लक्ष करत आहे असे सामाजिक कार्यकर्ते कृष्णा मुळे, विशाल गाजरे यांनी सांगितले. तसेच कसाबखेडा फाटा व माळीवाडा उड्डाणपुलाच्या खाली रस्त्याची अवस्था अतिशय खराब असून जिल्हा प्रशासन तथा पोलिस प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी स्थानिक नागरिकांकडून मागणी होत आहे

## जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा



**जालना (प्रतिनिधी) :** दरवर्षी २८ जुलै रोजी जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा केला जातो. हा दिवस आपल्या नैसर्गिक पर्यावरणाचे, ज्यामध्ये जंगले, पाणी, प्राणी आणि वनस्पती यांचा समावेश आहे, संरक्षण करण्याचे महत्त्व जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्मपित आहे. निसर्ग आपल्याला जीवनासाठी आवश्यक संसाधने प्रदान करतो आणि वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांसाठी त्यांचे जतन करणे ही आपली जबाबदारी आहे याची आठवण करून देतो.या पार्श्वभूमीवर बारवाले महाविद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांचे संगोपन करण्यात आले. परिसर स्वच्छता करण्यात येऊन झाडाना कुंपण घालण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. क्षमा अनभुले, प्रा. अभिजित भुतेकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ जुलै २०२५


## डॉ. संतोष साबळे यांना छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय पुरस्कार




**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील दृक श्राव्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉ. संतोष साबळे यांना नंदुरबार येथील नैसर्गिक मानवधिकार सुरक्षा परिषद फोरमतर्फे दिला जाणारा यंदाचा छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्कार रविवारी (दि. २७) विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.

डॉ. साबळे यांनी पत्रकारिता क्षेत्रातही अनेक वर्ष काम करून समाजातील ज्वलंत प्रश्नांकडे लक्ष वेधत विधायक बदल घडविण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. रोटरी क्लब ऑफ नाशिक या सामाजिक संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या या वेगवेगळ्या क्षेत्रातील अतुलनीय कार्याची दखल घेत त्यांना छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. संतोष साबळे हे गेल्या अनेक वर्षांपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या सरचिटणीसपदाची सूत्रे त्यांच्याकडे असून गेल्या अवघ्या पाच वर्षात मुक्त विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील तब्बल ५ लाख माजी विद्यार्थ्यांची सदस्यता नोंदणी झाली. यामुळे देशातील सर्व विद्यापीठांत सर्वाधिक माजी विद्यार्थी नोंदणी असलेले हे एकमेव विद्यापीठ ठरले असून ही कामगिरी करण्यात डॉ. साबळे यांची मोलाची कामगिरी ठरलीय.

राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात ते अतुलनीय योगदान देत आहे. विद्यार्थ्यांत नैतिक मूल्ये रुजविण्याचे त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या या कार्याची नोंद घेत नंदुरबार येथील नैसर्गिक मानवधिकार सुरक्षा परिषद फोरमने दिमाखदार सोहळ्यात माजी खासदार हिनाताई गावित, पोलीस उपअधीक्षक आत्माराम प्रधान, संजय महाजन, फोरमचे अध्यक्ष गोरख देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्कार डॉ. साबळे यांना प्रदान केला.

मुक्त विद्यापीठाच्या जनसंपर्क अधिकारी पदाचा पदभार असतानादेखील त्यांनी शिक्षणापासून दुरावलेल्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रसार माध्यमांतून विपुल प्रमाणात लेखन केले आहे. याशिवाय दृक श्राव्य केंद्राच्या माध्यमातून शेकडो शैक्षणिक कार्यक्रमांची निर्मिती करण्यात योगदान देत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, व्यवस्थापन मंडळाच्या सदस्य डॉ. संजीवनी महाले, दृक श्राव्य केंद्राचे प्रमुख डॉ. जयदीप निकम, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, धावपट्टू कविता राऊत, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

## आ. संजनाताई जाधव यांनी केली अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी



**कन्नड (अरुण थोरात):** चिखलठाण ता.कन्नड परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या मोठ्या प्रमाणात नुकसानीची आमदार सं◌ंजनाताई जाधव यांनी पाहणी केली. या नुकसानीत मुख्यतः चिखलठाण - वडाळी रस्त्यावरील खोकरी नदीवरील पुलाला पडलेले भगदाड, चिखलठाण - तिसगाव रस्त्यावरील गांधारी नदीवरील वाहून गेलेला पुल, तसेच तुरेवस्ती रस्त्यावरील नदीवरील वाहून गेलेला पुल आणि शेतकऱ्यांनी लोकवर्गणीतून उभारलेला तात्पुरता पूल वाहून गेल्याने शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा मार्ग पूर्णतः बंद झाला आहे.

या पार्श्वभूमीवर परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार सं◌ंजनाताई जाधव यांनी पाहणी दौरा करत स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. पुलांच्या दुरुस्तीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्री. हिवराळे यांच्याशी समन्वय साधून तात्काळ उपाययोजना करून वाहतूक पूर्ववत करण्याचा व्यवस्था करावी, असे निर्देश आमदार संजना जाधव यांनी दिले.

यावेळी ग्रामस्थ शेकनाथ चव्हाण, बाबासाहेब चव्हाण, प्रभाकर परसे, प्रताप चव्हाण, विनोद चव्हाण, दत्तु पा. चव्हाण, एकनाथ तुरे, नंदकुमार चव्हाण, निरंजन चव्हाण यांच्यासह सर्व शिवसेना पदाधिकारी युवासेना पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिवृष्टीमुळे चिखलठाण परिसरातील अनेक भागांमध्ये पूल व रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीला अडथळा येऊ नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाला तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे की शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना लवकरात लवकर दिलासा मिळावा. - **आमदार संजनाताई जाधव**




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ जुलै २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे नामांतर ठराव दिनाच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त "मराठवाडा विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार झाला, पुढे काय?" या प्रसंगिक विषयावर १२३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा २७ जुलै २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, १९७२ च्या काळात उदयास आलेल्या दलित पँथरच्या माध्यमातून औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे ही मागणी पुढे आली. ती सामाजिक सन्मान, ओळख आणि समानतेचा प्रतिक होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक कार्यासाठी, ज्ञानगंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचले होते. म्हणून त्यांच्या नावे एक विद्यापीठ असावे, असे अनुयायाने वाटत होते. म्हणून ती मागणी रास्त होती. ज्याला दलित पँथरचे तत्कालीन नेते राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे, ज. वि. पवार, रामदास आठवले, गंगाधर गाडे सह इतर सर्व नेतृत्वाने नेटाने चालविण्याचा प्रयत्न केला. १९७४ च्या मराठवाडा विकास आंदोलनातही नामांतराची मागणी करण्यात आली होती. १९७७ ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागणीची दखल घेऊन आश्वासन दिले होते. मात्र १९७८ ला सरकार बदलले आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तारूढ झाले. विधान परिषदेत आमदार पा. ना. राजभोज यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे, अशी मागणी लावून धरली होती. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतराबाबत पुढाकार घेऊन राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात २७ जुलै १९७८ ला नामांतराचा ठराव मंजूर करून घेतला.

मात्र याची वार्ता समाजजीवनात पसरताच विघ्नसंतोषी समाज विघातक सवर्णांनी विद्यापीठाला केवळ एखाद्या व्यक्तीचे नाव देणे पक्षपाती ठरेल, असा युक्तिवाद करून नामांतराच्या मागणीला प्रखर विरोध केल्याने सरकारला अंमलबजावणी करणे अशक्य झाले. परिणामी संघर्ष सुरू होऊन दलितांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. या अनुषंगाने प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च काढला होता. त्या लाँगमार्चला बुलढाणा जिल्ह्यातील रायरीच्या पुलावर अडविण्यात आले होते. त्यातील आंदोलकांना अटक करून राज्यातील विविध कारागृहात डांबण्यात आले होते. त्यामुळे प्रा. जोगेंद्र कवाडे यांना लाँगमार्च प्रणेते असे म्हटले जाते.

शेवटी १७ वर्षाच्या प्रदीर्घ आंदोलनाच्या संघर्षानंतर १४ जानेवारी १९९४ ला 'मराठवाडा विद्यापीठाचा' विस्तार मराठवाडा हा शब्द कायम ठेवून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद असा करण्यात आला. ही सर्व पार्श्वभूमी व इतिहास लक्षात घेतल्यावर नामविस्तार तर झाला पण त्यामुळे आंदोलन संपले की काय? पुढे काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्याची समर्पक उत्तरे आपण कधी शोधणार आहोत किंवा नाही? ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव दिलेले आहे. त्या विद्यापीठात बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, विचारधारा किती प्रमाणात आणि कशाप्रकारे शिकविल्या जात आहे? विद्यापीठात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा संशोधन केंद्र आहे. त्या अंतर्गत महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यात बोटावर मोजता येतील एवढेच विद्यार्थी प्रवेश घेत असतात? म्हणजे विद्यापीठात अनेक विभागात ज्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेश घेतात त्याचा विचार केला असता सर्वात कमी विद्यार्थी प्रवेश घेणारा विभाग म्हणजे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा हा विभाग होय असे म्हटल्यास वावगे, अनुचित होणार नाही. ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेले आहे त्याच विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा शिकविण्याविषयी असणारी अनास्था अनाकलनीय आहे. या अनुषंगाने विद्यापीठात कार्यरत असणारे विद्वान प्राध्यापक मंडळी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, कुलगुरू, कुलसचिव व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी यावर विचार केला पाहिजे. संबंधित विषयाची एवढी दुरावस्था का? याची कारणे शोधून काढली पाहिजेत. त्या विषयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नेट, सेट, पेट परिक्षा देता येतात काय? नुकत्याच विद्यापीठाने २०२४ मध्ये घेतलेल्या पेट परिक्षेत 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा' आणि 'पाली एंड बुद्धिजम' या विषयाचा नामोल्लेख सुद्धा टाळण्यात आला होता. म्हणजे यासारख्या विषयात विद्यार्थ्यांनी संशोधन करू नये, अशी विद्यापीठाची भूमिका असल्याची त्या पेटच्या नोटिफिकेशन्स मधून स्पष्ट झालेले आहे. विद्यापीठ त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व महाविद्यालयांना हे विषय शिकविण्यासाठी विशेष उपाययोजना करणार आहे काय? बार्टी सारख्या स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर संशोधन करण्यासाठी किती निधी खर्च करतात? यु जी सी सारख्या संस्था यासारख्या अशा विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत काय? भारतातील सर्व केंद्रीय, राज्य, माहिती तंत्रज्ञान व मुक्त विद्यापीठ, खुले विद्यापीठे, विशेष विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठातून सदरील विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत? या विषयात शैक्षणिक अर्हता प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना विविध नौक-यात सामावून घेतले पाहिजे. या विषयांत प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभात गौरव करण्यात आला पाहिजे. जेणेकरून विद्यार्थी संबंधित विषयात शिक्षण घेण्यासाठी पुढे येऊ शकतील. करिता केजी टू पीजी अभ्यासक्रमात फुले शाहू आंबेडकरवादाचा समावेश केला पाहिजे. अशा सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून उपाययोजना केल्या तर या माध्यमातून सुद्धा विद्वान, प्रज्ञावान, शीलवान, चारित्र्यसंपन्न आंबेडकराईट निर्माण होऊ शकतील. ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महासागरातून वेचलेले वैचारिक अनमोल मोती आपल्या जीवनात आकार देण्यासाठी सक्षम असल्याने ते समजून घेणे आवश्यक आहे. ही आपल्या जीवनाची प्राथमिकता असावी. ज्याची समाजाला नितांत आवश्यकता आहे. परिणामी भारताचे संविधानाला अपेक्षित आधुनिक भारतीय समाजाची निर्मिती होऊ शकेल.

या सर्व बाबीचा विचार करून ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता सदरील विषयावर कार्यशाळेच्या माध्यमातून प्रासंगिक सविस्तर चर्चा करीत आहोत. विस्ताराने समजून घेण्यासाठी या विषयावर लिहिलेला सविस्तर लेख दै. महावृत्त, दै. घटनेचा शिल्पकार यांनी आज प्रकाशित केला आहे. ते आपण समजून घ्यावे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना महानगरपालिकेचे माजी नगरसेवक सभापती माणिक साळवे म्हणाले की, दलित पँथरच्या स्थापनेने जनतेला जागृत करण्याचे कार्य हाती घेण्यात आले होते, ज्या मार्फत नामांतराची मागणी लावून धरण्यात आली होती. ज्या अनुषंगाने २७ जुलै १९७८ ला विधिमंडळात नामांतराचा ठराव मंजूर करण्यात आला होता. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी १४ जानेवारी १९९४ ला नामविस्ताराने झाली. प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना गंगाधर गाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कटारे म्हणाले की, आता आपणास ज्ञानाच्या बळावर लढावे लागेल. तत्कालीन परिस्थितीत नामांतराचा प्रश्न सोडवण्यासाठी जशी कृती समिती स्थापना करण्यात आली होती तसेच नामांतर विरोधी कृती समिती सुद्धा स्थापन करण्यात आली होती. मराठवाडा मुक्ती संग्रामात आंबेडकर वाद्यांचा सहभाग नव्हता असे गृहीत धरून त्यांनी नामांतराला विरोध केला होता. वर्तमान परिस्थितीत आपनास रडत बसून चालणार नाही तर लढावे लागेल.

याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, वर्तमान नेतृत्वाने दखल घेऊन नामांतर शहिदांच्या परिवाराच्या स्थिती जाणून घेतल्या पाहिजेत. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, नामांतर ऐवजी नामविस्तार करणे म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवण्यासाठी आहे. आंबेडकराईट संघटना मजबूत नसल्याने सक्षम विद्यार्थ्यांवर विविध स्तरावर विद्यापीठात अन्याय केला जातो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी डावलले जाते. २०२४ मध्ये घेण्यात आलेली विद्यापीठाची शेवटची पेट परीक्षा होती. म्हणजे यापुढे केवळ नेट केलेल्या विद्यार्थ्यांना पीएचडी करता येणार आहे. नेते, पालक व विद्यार्थी यांनी फार जागरूक असणे आवश्यक आहे. सुरेश भगत म्हणाले की, विद्यापीठात पाली विभागाला संशोधन करण्यासाठी गाईड उपलब्ध नाहीत अर्थात पालीला कोणी वाली नाही अशी विद्यापीठाची स्थिती आहे. न्यायमूर्ती बी. एन. वाघ म्हणाले की, विधिमंडळात ठराव संमत झाल्यावर सुद्धा प्रस्थापितांची गरज म्हणून त्यांनी हा विषय प्रदीर्घकाळ प्रलंबित ठेवला. एकेकाळी कांशीरामजीच्या माध्यमातून बहुजन समाजाला संघटित करण्यासाठी प्रयत्न केले गेलेत. देशात होणारे बॉम्बस्फोट, दहशतवादी हल्ले आणि दंगली यामागील कारणे आपण शोधून काढली पाहिजेत. ललित सिद्धी म्हणाले की नीतिमत्ते अभावी अहंकार विकसित होऊन मानवी मनाचा ऱ्हास होतो, करिता समाजाला सुधारताना स्वतः सुद्धा सुधारले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन उद्योजक मिलिंद बागुल व प्रास्ताविक इंजिनियर किशोर पाटील यांनी तर आभार अशोक मेश्राम यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला न्यायमूर्ती बी. एन. वाघ, सुरेश भगत, बी. बी. मेश्राम, एड. इंजिनीयर किशोर पाटील, उद्योजक शशिकांत काळे, साधू आनंद, माणिकराव साळवे, विलास कटारे, प्राध्यापक शिवम गायकवाड, धम्मचारी ललितसिद्धी, सोहेल पटेल, अशोक मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

**शब्दांकन : बी. बी. मेश्राम,**

संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : ८९८३०८२१२८ (Wh), ९४२१६७८६२८ (C) circumference1968@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002